# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे शाखा

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-४४२/२०२२ दिनांक :- ०७/०३/२०२२.

### RBL Credit Card कार्डावरुन फसवणुक झालेली १८,१८० /- रुपयाची रक्कम तक्रारदाराला परत - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी

दिनांक ०१/०३/२०२२ रोजी सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारदार नामे शिवांग जोशी, पत्ता – १२०३/१७, डी.बी झोन, ठाकुर मॉलजवळ, काशिमिरा, मिरारोड पुर्व यांचेकडून तक्रारी अर्ज प्राप्त झालेला होता. तक्रारदार यांना दिनांक ०१/०३/२०२२ रोजी मो.क्र.८९७९५२००३९ या अनोळखी क्रमांकावरुन फोन आला होता. सदर अनोळखी इसमाने तक्रारदार यांना तुमचे RBL Credit Card अपडेट करायचे आहे तेव्हा तुमचे मोबाईलवर एक OTP Number येईल तो दया असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर आलेला OTP Number सांगितला असता त्याचे RBL Credit Card यातुन १८,१८०/- रुपये कपात झाल्याचा त्यांना मॅसेज आला. त्यावेळी तक्रारदार यांची अनोळखी फोन धारकाकडुन फसवणूक झाल्याची निदर्शनास आल्याने त्यांनी तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे दिला.

सदरची तक्रार प्राप्त होताच सायबर गुन्हे कक्षाने तात्काळ कारवाई करीत क्रेडिट कार्डच्या ट्रान्झॅक्शनचे अवलोकन केले असता सदरची रक्कम ही पेटीएमच्या माध्यमातुन गेल्याचे दिसुन आल्याने पेटीएमसोबत तात्काळ पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम वळती झालेल्या खात्यात रोखण्याकरीता पत्रव्यवहार करण्यात आला. सायबर गुन्हे कक्ष यांचे निर्देशावरुन पेटीएम कंपनीने तक्रारदार यांची फसवणुकीबाबतचे ट्रान्झॅक्शन तात्काळ रद्द करुन फसवणुक झालेली **एकुण १८,१८०/- रु** रक्कम अवघ्या अर्ध्या तासात तक्रारदार यांचे क्रेडिट कार्डावर परत जमा केलेली आहे.

सायबर गुन्हे कक्ष यांचेकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही अनोळखी मोबाईल क्रमांकावरुन फोन आल्यास समोरच्या व्यक्तीने सांगितल्याप्रमाणे आपल्या बँकिग संदर्भात कोणतीही माहिती देवु नये. बँकेचे/क्रेडिट कार्डसंबंधी कोणतीही माहिती अगर ओटीपी अनोळखी इसमास देवु नये. मोबाईलवरुन कोणतेही ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले असता ते डाऊनलोड करु नये.

सदरची कामगिरी मा.श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुजिकुमार गुंजकर, पोनि/सायबर क्राईम सेल, श्री.प्रसाद शेनोलकर, पोउनि/सायबर क्राईम सेल, मपोशि/सुवर्णा माळी, सायबर क्राईम सेल, मपोशि/ माधुरी धिंडे, सायबर क्राईम सेल यांनी केली असुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम १८,१८०/- रु पुर्ण रक्कम तात्काळ कारवाई करुन त्यांना परत करण्यात आली आहे.

----